**नियमीत फौजदारी खटला क.७५६/१३**
**सरकार -वि-शांता व इतर**
**निशानी कमांक ३४**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार कमांक २ चे बयान</u>**

**मी शपथपुर्वक खरे सांगतो की :-**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :- | पंचराम बहुरसिंग साहु |
| वय | :- | ५५ वर्षे, |
| व्यवसाय | :- | चौकीदार, वन विभाग |
| राहणार | :- | दिघोरी, नागपूर |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे श्री.व्हि.यु मिरचे</u>**

१. मी वन विभागाच्या कार्यालयात चौकीदार या पदावर कार्यरत आहे. मला वर्ष २०१० मध्ये मला वन विभागाचे सेमिनरी हिल नागपूर येथील नर्सरीला जप्ती पंचनामासाठी बोलविण्यात आले होते. मला तेथे हरणाचे व काळवीटचे शिंगे दाखविण्यात आले. सदर शिंगे तेथे सिलबंद करण्यात आले. मौका पंचनामा नि.क्र.३१ मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. माझे बयाण नोंदविण्यात आले नाही.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री.एल.बी.खेरगडे वकील</u>**:-

मौका पंचनामा वन विभागाचे सेमिनरी हिल नागपूर येथील नर्सरीला तयार करण्यात आले होते हे म्हणणे खरे आहे. सेमिनरी हिल नागपूर येथील नर्सरी येथील कार्यालय व्यतिरीक्त मी इतर कुठल्याही ठिकाणी गेलो नाही हे म्हणणे खरे आहे. पंच साक्षीदार म्हणून हजर राहण्यासाठी मला लेखी सुचना देण्यात आली नाही. वन संरक्षक ए.जी.अंजीकर आणि वन परिक्षेत्र अधिकारी डि. आर.नंदनवार यांनी मला शिंगे जप्त केले आहेत असे सांगितले व त्यांनी मला पंच साक्षीदार म्हणून सही करण्यास सांगितल्याने मी सहया केल्या हे म्हणणे खरे आहे. मौका पंचनामा मधील मजकुर मला माहित नाही हे म्हणणे खरे आहे. मला पंच साक्षीदार म्हणून बोलाविण्यात आले नाही हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृती

(सि.आर.बलवानी)

दिनांक : १३.१२.२०१९ अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर